नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/02/2024 (रविवार) सकाळ

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## वाहनासह एकुण ४५,९५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
## नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई

दिनांक २५.०२.२०२४ चे ००.३० वा. दरम्यान मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे कुही हद्दीत गस्त करीत असता, गोपनीय सुत्रधाराकडुन माहीती मिळाली की, १६ चक्का एलपी वाहनामध्ये अवैधरित्या विनापरवाना रेती लोड करून पवनी भंडारा कडुन नागपुर मार्गे जाणार आहे, अशा खात्रीशीर बातमीवरून मिळालेल्या खबरेप्रमाणे मौजा कुही हद्दीतील मेन रोडवरील चांपा टोल नाका येथे रोडवर थांबुन अवैध रेती सबंधाने अचानक नाकाबंदी करून नागपुरकडे जाणारे वाहने चेक करीत असता एक १६ चक्का एलपी गाडी आढळुन आली, सदरचे वाहन चालकांनी आपले ताब्यातील वाहन थांबविले, सदर वाहनांची पाहणी केली असता, एक पांढ—या व ऑरेन्ज रंगाची टाटा कंपनीची १६ चक्का एलपी वाहन क्र. एम. एच.— ३७/टी ४५६७ हे वाहन आढळुन आले. सदर वाहन चालक व कंडक्टर यांना त्यांचे नाव व पत्ता विचारला असता, त्यानी आपआपले नाव **१) आशिष डिगलाल राउत, वय २३ वर्ष, रा. फैजलपुरा कुंभारवाडा, नगीना मस्जीदजवळ अमरावती, (एम.एच. ३७ टी ४५६७ चा चालक), २) असलम उर्फ रहीम बिसमिल्ला शेख, वय २८ वर्ष, रा. फैजलपुरा कुंभारवाडा, नगीना मस्जीदजवळ अमरावती (एम. एच. ३७ टी ४५६७ चा कंडक्टर)** असे सांगीतले. सदरचे वाहन चालकांना, एलपी वाहनात काय लोड आहे आहे? याबाबत विचारणा केली असता, रेती लोड असल्याचे सांगीतले. सदर रेती वाहतुक करण्याचा मिळुन आलेल्या एलपी वाहन चालकांना महसुल विभागाचा परवाना मागीतला असता, नसल्याचे सांगीतले. तसेच गाड़ी मालकाचे सांगणेप्रमाणे आसपुर भंडारा घाटातुन रेती खाणपट्टा धारक नामे महेष हटवार यांचेकडुन रेती लोड करून उमरेड—नागपुर मार्ग अमरावती येथे घेवुन जात असल्याचे सांगीतल्याने आरोपींच्या ताब्यातून एक पांढऱ्या व ऑरेंज रंगाची टाटा कंपनीची १६ चक्का एलपी वाहन क्र. एम.एच. —३७/टी— ४५६७ किंमती ४५,००,०००/—रू. मध्ये १५ ब्रास रेती प्रत्येकी ब्रास ५०००/—रू. प्रमाणे ७५०००/—रू., दोन वेगवेगळे मोबाईल किंमती २०,०००/—रू. असा एकुण ४५,९५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी **१) आशिष डिगलाल राउत, वय २३ वर्ष, रा. फैजलपुरा कुंभारवाडा, नगीना मस्जीदजवळ अमरावती २) असलम उर्फ रहीम बिसमिल्ला षेख, व्य २८ वर्ष, रा. फैजलपुरा कुंभारवाडा, नगीना मस्जीदजवळ अमरावती, ३) चंद्रेष वसंतराय मेहता, रा. जयस्तंभ चौ कारंजा (लाड), जिल्हा—वाशीम पाहीजे आरोपी ४) महेष हटवार, रा. आसपुर, पवनी भंडारा** असे एकुण ०४ आरोपीतांविरूद्ध कलम ३७९, १०९, ३४ भादंवि. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम—१९६६, सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे (विकास आणि नियमन) अधिनियम—१९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतीबंधक अधिनियम १९८४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. अमित पांडे, पोलीस हवालदार ललीत उईके, पोलीस नायक प्रणय बनाफर, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, बालाजी बारगुले, शुभम मोरोकार विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर